स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक **26–09–2011** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 16. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर. झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 85</u> :– अंबाझरी उद्यानाकरीता एकात्मीक विकास योजने करीता प्रस्तावित असलेली जागा वगळून अंबाझरी उद्यानालगत उत्तरेकडील मोकळया जागेत लोकमत ग्रुपतर्फे प्रायोजित राष्ट्रीय ध्वज (National flag) व मास्ट उभारणीचे प्रस्तावास मंजूरी देण्याचा तसेच सदरील प्रकल्पाकरीता मे. व्हि.के. असोसीएट्स यांची प्रचलित अटी व शर्तीवर प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 86</u> :– वार्ड क्र. 65, मधील फवारा चौक ते गांजाखेत चौक येथील रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण तसचे पावसाळी नालीचे बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. भगतसींग रेहाल, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.75 टक्के कमी दराची रु. 1,33,56,565/– राशीची निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच पद क्र. 681 मधून च्या कामास प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन आर्थीक वर्ष 2011–12 मध्ये कार्यादेश राशी रु. 50.00 लक्ष सिमित ठेवण्याच्या अटीवर विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कंत्राटदाराकडून 15 दिवसाच्या आंत काम सुरु करण्याचे हमी पत्र कार्यालयाने घ्यावे. तसे हमी पत्र प्राप्त न झाल्यास फेर निविदा करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 87</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात रोड आस्थापना तसेच नाली आस्थापना मध्ये पदस्थापीत सफाई कामगारांना अनुक्रमे रु. 70/– झाडू टोपली करिता तसेच रु. 30/– पावडा दांडया करिता मासीक वेतनात लागु करण्यासाठी तसेच हयावर रु. 25,94,400/– चा खर्च पद क्र.173 मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 88</u> :– वार्ड क्र. 94, आझमशाह ले आऊट भगत कॉलनी येथे महर्षी सुदर्शन धाम चे निर्माण करण्याचे कामास्तव रु. 44,84,366/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलाविण्याचा तसेच डीझाईनर्स इनकॉर्पोरेशन (आर्कीटेक्ट श्री. राजेश जोशी) यांची पी.एम.सी. म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 89</u> :– वॉर्ड क्र. 37, वैशालीनगर येथील निर्वाण घाटाचे सौंदर्यीकरण रु. 45,00,745/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा तसेच आर्कीटेक्ट इंटरनॅशनल (श्री. परमानंद रामटेके , आर्कीटेक्ट ) यांची पी.एम.सी. म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 90</u> :– वॉर्ड क्र. 130, दिघोरी दहन घाट येथे विविध विकास कामे व सौंदर्यीकरण करण्याचे कामास्तव रु. 49,66,832/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा व श्री. उमेश पाटील (इम्पॅनल्ड आर्कीटेक्ट) यांची पी.एम.सी. म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 91</u> :– म.न.पा. ठराव क्र. 222, दिनांक 05.05.2011 अन्वये म.न.पा. चे दवाखाने पी.पी.पी. प्रकल्पा अंतर्गत चालविण्याकरीता दर मागविण्यात आलेले होते. त्यात सदर रोग निदान केंद्र येथे सिटीस्कॅन, सोनोग्राफी, इको, कलर डॉपलर व एक्स–रे इत्यादि सुविधांकरीता मे. नाईसा डायलो केअर, गांधी ले आऊट, नागपूर यांचे सर्वात कमी दर (CGHS दरापेक्षा 7.5% कमी दराने) असल्यामुळे त्यांना प्रकल्प राबविण्यास्तव प्रती महिना एक रुपया प्रती चौरस फुट दराप्रमाणे जागा उपलब्ध करुन देण्यास्तव नमूद दरानुसार प्रथम पाच वर्षाकरीता दवाखाना/प्रकल्प चालविण्याकरीता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन महानगरपालिकेशी होणाऱ्या कोणत्याही संविदेत म.न.पा. अधिकारी, कर्मचारी अथवा त्यांचे नातेवाईक यांचा हितसंबंध असता कामा नये अशी तरतूद म.न.पा. अधिनियम कलम 52 मध्ये आहे काय, असल्यास सामान्य प्रशासन विभागाने तपासुन योग्य टिपणीसह हा विषय परत स्थायी समितीस ठेवण्यास विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 92</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर